# लेखन स्पर्धा - २०१९-२०

मागील वर्षी आपण लेखन स्पर्धा घेतली होती. ह्यावर्षी पुन्हा आपण वेगवेगळे विषय देऊन स्पर्धा घेत आहोत. आलेल्या उत्कृष्ट लेखांना जानेवारी २०२० मध्ये होणाऱ्या भिडे संमेलनामध्ये भरघोस पारितोषिके दिली जातील. आपला प्रतिसाद हीच 'आम्ही भिडे'ची ताकद आहे.लेख पाठविण्यासाठी पत्ता **- दिलीप वासुदेव भिडे, सी-१०२, मेघमल्हार रागा अपार्टमेंट, एलएमडी चौकाजवळ, मराठा मंदिरमागे, बावधन, पुणे ४०००२१.** किंवा **dilip.bhide15@gmail.com** ह्या संकेस्थळावर सुद्धा पाठवू शकता. (शब्दमर्यादा ३०० शब्द) आलेल्या लेखांना ऑक्टोबर २०१९ च्या अंकापासून, प्रत्येक लेखाला प्रसिद्धी दिली जाईल. सोबत आपला एक 'आयकार्ड' साईज फोटो सुद्धा देणे आवश्यक आहे. लेख पाठविण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०१९. विषय खालीलप्रमाणे -

१) पहिलं-वहिलं - लहानपणापासून प्रत्येक नवीन किंवा प्रथम मिळालेल्या गोष्टीचे कुतुहल, कौतुक प्रत्येकालाच असते. माझी पहिली वही, पहिले पुस्तक, पहिली गाडी, घड्याळ, पहिला बंगला (जागा), फ्लॅट, मग ती वस्तू जुनी असो वा नवी परंतु आयुष्यामध्ये प्रथमच मला मिळाली किंवा मिळवली ह्याबद्दल कुतुहल किंवा अभिमान असतो. अशा वस्तूंची जपणूक करतो. ही वस्तू हरवली, किंवा विकायला लागली तर आपल्याला त्याचे दुःख होते. त्याच्या भूतकाळातील मनोरंजक, क्लेशदायक, आव्हानात्मक आठवणी शेअर करायच्या आहेत.

२) पर्यावरण - बिघडलेले निसर्गचक्र दुरुस्त करण्यासाठी किंवा भविष्यामध्ये पर्यावरण रक्षणासाठी आपण उचललेला खारीचा वाटा, पर्यावरणाचा सातत्याने होणारा ऱ्हास आणि त्यामुळे मानवी अस्तित्वाला निर्माण झालेला संभाव्य धोका, दूषित हवा, पाणी तसेच प्रदूषणामुळे मानवी आरोग्यावर होणारा परिणाम, कचरा व्यवस्थापन, जैव विविधतेचे जतन व विकास जागतिक तापमानवृद्धीबाबत योजना, पर्यावरणाचे जतन करण्यासाठी पूरक असे कोणते फायदे आहेत वा असावेत अशा नानाविध प्रश्नांवर तोडगे, उपाय, आपल्या कल्पना मांडाव्यात.

३) माझे माहेर - माहेर शब्द उच्चारला की महिलांचे मन भूतकाळात रमते. त्यावेळच्या आठवणी, आपले घर, शाळा, मित्र-मैत्रिणी, घरातले वातावरण, आई-वडील ह्यांच्या मायेची ऊब, प्रेम, संस्कार व शिस्त कशी होती ह्या बद्दल काही अनुभव आपल्या माहेरच्या पूर्ण नावासहित द्यावेत.

४) स्टार्टअप - मुले, मुली, गृहिणी छोटेखानी व्यवसाय करतात. कमी भांडवल असूनसुद्धा धाडस करतात. त्यासाठी मार्केटींग करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर, गुणवत्ता टिकवण्यासाठी हुशारीने व्यवसाय करतात. त्यासाठी भांडवलाची जमवाजमव, उद्योग सुरू करण्याची कल्पना सुचणे, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी आणि त्यातून निघालेला मार्ग ह्यांचा समावेश असावा.

५) भटकंती - भटकंती करण्यासाठी काही मंडळी देश-विदेशात आवर्जून भेट देतात तर काही कौटुंबिक मेळावा व कार्य ह्या निमित्ताने जातात, तर काहीजण कोणत्याही ट्रॅव्हल्स वा गाईडची मदत न घेता आपणच देश-विदेशात भटकंतीचे नियोजन करतात. अशा अपरिचित देश व विदेशात आलेले अनुभव.

६) माझा बगीचा - कधी मोठ्या जागेत, तर कधी गच्चीत किंवा गॅलरीच्या जागेत बगीचा फुलवून झाडांशी, निसर्गाशी आपले नाते कसे जवळचे आहे, अशा फळाफुलांनी बहरलेल्या तुमच्या बागेविषयी अनुभवासहित लिहा.

७) सूर, ताल, लय ह्यांच्या एकत्रिकरणातून मनाला भावलेलं गाणं तसेच त्या गाण्यामधील शब्द, चाल, वाद्यांचा वापर, गायकाचा आवाज, कलाकारांचा अभिनय ह्याबद्दल आपल्याला काय वाटतं ? असं गाणं की नकळत हसवणारं तर कधी डोळ्यांच्या कडा ओलावणारं, तर कधी भूतकाळात नेणारं आणि आपल्या आठवणी जागवणारं असं. मला भावलेलं गाणं.

८) परीक्षा - इ. १० वी १२ वी ची शालांत परीक्षा म्हणजे प्रत्येकाच्या आयुष्यातील व शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा असतो. आपल्या पाल्याची ही परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांबरोबर पालकांचीसुद्धा तारेवरची कसरत असते. ह्या आयुष्याच्या महत्त्वाच्या टप्प्यामध्ये यश मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेले प्रयत्न आणि पालकांची साथ आणि दिलेले प्रोत्साहन, की ज्या प्रयत्नांमुळे आपल्याला किंवा आपल्या पाल्याला घवघवीत यश मिळाले हे आपल्या अनुभवासह लिहा.


आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

**Bhide & Associates**

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779